# प्रेसनोट

दिनांक ३१/१२/२०१७ रोजी व दिनांक ०१/०१/२०१८ रोजी मध्यरात्री सरत्या वर्षाला निरोप देण्याकरिता व नववर्षाच्या स्वागताकरिता ठाणे पोलीस आयुक्तालयातील तलाव पाली, येऊर हिल्स्, उपवन व दुर्गाडी याठिकाणी तसेच विविध हॉटेल्स्, खाडी किनारी, बाग व निसर्गरम्य ठिकाणी पाटर्यांचे आयोजन केले जाते. अशा ठिकाणी नागरिक त्यांच्या कुटुबियांसह येत असल्याने मोठया प्रमाणात गर्दी जमा होते. गर्दीच्या ठिकाणी तरूण मुली व महिला यांची छेडछाडीचे घटना होवु नये तसेच अनुचित प्रकार होवू नये याकरिता खालील उपाययोजना करण्यात येत आहेत.

१) ज्या ठिकाणी पार्टीचे आयोजन केले जाणार आहे अशा ठिकाणी विशेष बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे.

२) घातपात चे प्रकार होवू नये याकरिता डॉग व अॅन्टी सबोटेज चेकींग करण्यात येणार आहे.

३) धोकादायकरित्या वाहन चालविणे ,ड्रंक अॅण्ड ड्राईव्ह बाबत विशेष मोहिम राबविण्यात येणार आहे.

४) महिला छेडछेर्डीच्या घटना होवू नये याकरिता विशेष शाखा, गुन्हे शाखा, पोलीस स्टेशन यांचा साध्या वेशातील पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे.

५) मालमत्ते विरूध्द व शरीराविरूध्दचे गुन्हे घडु नये याकरिता पायी पेट्रोलिंग तसेच मोबाईल पेट्रोलिंग वाहने बंदोबस्ताकरिता ठेवण्यात येणार आहेत.

६) शहरातील महत्वाच्या चौकात व प्रमुख मार्गावर नाकाबंदीचे आयोजन करण्यात येणार आहे.

नववर्षाच्या स्वागताच्या वेळी कोणताही अनुचीत प्रकार घडु नये म्हणुन ठाणे पोलीस आयुक्तालयात एकुण ५५० पोलीस अधिकारी व ६००० पोलीस कर्मचारी बंदोबस्ताकरिता नेमण्यात आलेले आहेत. तसेच शहर वाहतुक शाखेकडुन महत्वाच्या चौकात वाहतुक शाखेचे ८० पोलीस अधिकारी व ४५० पोलीस कर्मचारी तैनात केलेले आहेत.

नवीन वर्ष सर्व नागरिकांना सुखाचे, शांततेचे, समृध्दीचे जावो अशी शुभेच्छा देवून मा. पोलीस आयुक्त श्री. परमबीर सिंह यांनी नागरिकांनी नवीन वर्षाचे स्वागत हर्षोल्हासात, शांततेत व संयमाने करावे असे आवाहन केले आहे.

Scanned by CamScanner